

डॉ. जब्बार पटेल, किशोरी शिंदे, राजकुमार चोरडिया, डॉ. गो. बं. देगलुरकर, परिचारिका लकी, डॉ. के. एच. संचेती आणि रवी पंडित यांना 'पुणे प्राइड' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रेसिडेन्सी क्लबतर्फे हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे यंदा चोविसावे वर्ष आहे. ब्रह्मा कॉर्पोरेशन ग्रुपचे अध्यक्ष आर. के. अग्रवाल, लीला पूनावाला फाउंडेशनच्या अध्यक्ष लीला पूनावाला, 'आयसर'चे संचालक श्रीकृष्ण एन. गणेश यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

# शाश्वत शेतीसाठी जैवतंत्रज्ञानाचा स्वीकार केला पाहिजे

## डॉ. तुकाराम मोरे यांचे मत

प्रतिनिधी, पुणे

**शाश्वत शेतीसाठी** जैव तंत्रज्ञानाचा स्वीकार केलाच पाहिजे. त्यामध्ये काही दोष असतील तर ते दूर करू, परंतु कुठल्याही तंत्रज्ञानाला दोष देऊ नका, असे आवाहन करत जीएम म्हणजेच जनुकीय बदल पिकांमुळे शेतकऱ्यांना 'अच्छे दिन' येतील, असे मत महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांनी व्यक्त केले.

वनराई संस्थेतर्फे आयोजित 'संगम -२०१५' या राष्ट्रीय पातळीवरील शेतकरी नेत्यांच्या परिषदेच्या समारोप सत्रात मोरे बोलत होते. कॉन्फेडरेशन ऑफ हॉर्टिकल्चर ऑफ असोसिएशन ऑफ इंडिया'चे (चाय) अध्यक्ष एच. पी. सिंग, महाराष्ट्र राज्य शिक्षण आणि संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. राम खर्चे, कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर, जिल्हा कृषी अधिकारी सुभाष काटकर, 'वनराई'चे अध्यक्ष रवींद्र धारिया या वेळी उपस्थित होते.

मोरे म्हणाले, ''महात्मा फुले कृषी विद्यापीठात जीएम पिकांच्या सर्व चाचण्या नियम आणि अटी पाळून यशस्वी रीत्या पूर्ण झाल्या आहेत. मात्र, अजूनही त्याबाबत निर्णय झालेला नाही. संसदेची मान्यता मिळाल्यानंतर त्याचा विचार करू असे सांगितले जात आहे. मात्र तोपर्यंत उशीर झाला असेल. बीटी कॉटनलाही असाच विरोध झाला होता, मात्र नंतर बीटी कॉटन हे फायदेशीर असल्याचे सिद्ध झाले आहे.''

दहा जीएम पिकांच्या चाचण्या पूर्ण झाल्या असून गव्हाची चाचणी सुरू असतानाच सरकारचा संशोधन बंद करण्याचा फतवा आला. या तंत्रज्ञानाचा फायदाच नसेल तर आपण त्यावर करोडो रुपये का खर्च करत आहोत, असा सवालही मोरे यांनी या वेळी उपस्थित केला. शेती फायदेशीर झाली पाहिजे याबाबत सर्वांचेच एकमत आहे. परंतु पश्चिम भारतातील महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान येथील भौगोलिक स्थिती वेगळी आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून व चिंतन करून सर्वांचा एक दिशादर्शक मसुदा तयार केला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. राम खर्चे म्हणाले, '' शेती हा व्यवसाय आहे आणि त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेशी संबंध आहे, हे डॉ. अमर्त्य सेन यांनी सांगितले. सेंद्रिय शेतीच्या बाबतीत चर्चा होते. मात्र, सलग ३-४ वर्षे सेंद्रिय शेती केल्यानंतर ते फायदेशीर ठरल्याचे उदाहरण नाही. हवामानातील बदल व पीक पद्धतीमध्ये बदल यावर संशोधन होण्याची गरज आहे.''

पाशा पटेल म्हाणाले, ''शेतीमध्ये लावलेला पैसा परत येत नाही ही समस्या असताना आता हवामानातील बदलाची समस्या निर्माण झाली आहे. निसर्गाचे चक्र व्यवस्थित असतानाही शेतकऱ्यांचे भले झाले नाही, तर आता काय होणार हा खरा प्रश्न आहे.''